# विटा नगरपरिषद, विटा

दुरध्वनी : 02347 272021 टोल फ्री : 180023323
ई-मेल : covitamc@gmail.com वेबसाईट : https://vitacity.in/

## जनहीत याचिका क्र. 155/2011 च्या अनुषंगाने संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करणेबाबत

| अ. क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 01 | होर्डींग्ज, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती लावणेसाठी निश्चित केलेल्या जागांची माहिती | यासमवेत माहिती जोडणेत आली आहे. |
| 02 | सदर जाहिरातीकरीता Integrated Wb based Portal अथवा इतर उपलब्ध असणाऱ्या सॉफ्टवेअर द्वारे दररोज दिल्या जाणाऱ्या परवानगींची माहिती | Integrated Wb based Portal द्वारे सदर जाहिराती बाबत परवानगी दिली जाते.. |
| 03 | होर्डींग्ज, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती यावर QR कोड लावणेबाबत केलेली कार्यवाही | जाहिरातीकरीता परवानगीसाठी येणाऱ्या अर्जदारांना त्या त्या वेळे QR Code नगरपरिषदेकडून दिला जातो |
| 04 | सदर तक्रार निवारणासाठी टोल फ्री क्रमांक / दुरध्वनी क्र. | टोल फ्री क्र. 1800 23323<br>दुरध्वनी नं 02347 272021 |
| 05 | संबंधित नोडल अधिकारी यांची तपशीलवार माहिती | नाव : श्री. आनंदा सावंत,<br>अतिक्रमण विभाग प्रमुख<br>मोबाईल नं : 9421133065 |

मुख्याधिकारी
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 10/11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.172

विषय – नगर परिषद हद्दीमध्ये जाहिरात धोरण निश्चित करणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी अतिक्रमण विभाग प्रमुख यांची दिनांक 10/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) महाराष्ट्र नगरपालिका (जाहिरातींवर कर) नियम,1970

3) नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र. पीएमसी 3010/प्र.क्र.394 (भाग-2)/नवि-22 दि.22/06/2023

नगर परिषद हद्दीमध्ये विविध साधनांद्वारे किंवा माध्यमांद्वारे जसे की भित्ती पत्रके,जाहिरात फलक, कापडी फलक, तात्पुरत्या कमानी, प्रकाशित चिन्हे, नाम फलक, दिशादर्शक फलक, आकाश चिन्हे, प्लाकार्ड, डिजिटल बोर्ड, एलईडी, एलसीडी, बॅकलिट बोर्ड, निऑन बोर्ड डिसप्ले, ईलेक्ट्रॉनिक डिसप्ले, व्हिडीओ डिसप्ले, लेझर शो/देखावा किंवा फुगे याद्वारे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी किंवा माहिती देऊन व्यावसायिक फायद्याकरिता किंवा प्रसिद्धीकरिता,कोणत्याही रस्त्यावरून, मार्गावरून दिसेल अश्या रीतीने निवेदन किंवा कृती याद्वारे जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात.

संदर्भ क्र.2 नुसार जाहिरात कर आकारणी करणे तसेच होर्डिंग, जाहिरात फलकांना परवानगी देणे अंतर्भूत आहे. संदर्भ क्र.3 नुसार महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत (आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण मार्गदर्शक तत्वे, 2023 या मार्गदर्शक तत्वांना मान्यता देण्यात आली आहे. सदर मार्गदर्शक तत्वानुसार नगर परिषद हद्दीत धोरण निश्चित करणे तसेच किमान आकारणी दरवाढ करणे आवश्यक आहे. यामुळे नगर परिषदेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच अनाधिकृत जाहिरातींवर आळा बसून शहर विद्रुपीकरण कमी होणार आहे.

नगर परिषदेमार्फत जाहिरात होर्डिंग वर कर आकारणी करण्यासाठी करण्यात आलेला सर्वसाधारण ठराव क्र.84, दि.21/12/2021 रद्द करणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र.2 व 3 नुसार खालीलप्रमाणे जाहिरातींच्या प्रकारानुसार तपशील व दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जाहिरातीचा प्रकार | तपशील | दर |
|---|---|---|---|
| 1. | आकाशचिन्ह (स्काय-साईन) प्रकाशित जाहिरात | आकाशचिन्ह किंवा ज्याच्या कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो आकाश चिन्ह. | प्रति चौ. फुट रक्कम रु. 150/- (वार्षिक) अनामत रक्कम 10,000/- जाहिरात (होर्डिंग) परतावा + इतर शासकीय कर. |

पान नं.2 वर

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | जाहिरात होर्डिंग (खाजगी जागेवरील/इमारतीवरील) (फिक्स/पर्मनंट) | 10 फुट x20 फुट , 20 फुट x10 फुट<br>20 फुट x20 फुट , 30 फुट x15 फुट<br>30 फुट x20 फुट | प्रति चौ. फुट रक्कम रु.15/- प्रति महिना + इतर शासकीय कर. |
| 3. | निशाण (बॅनर)/जाहिरात फ्लेक्स (तात्पुरते) (लांबी * रुंदी) (खाजगी/सार्वजनिक जागा) | ज्यामध्ये जाहिरातीचा किंवा घोषणेचा किंवा लिखित मजकुराचा समावेश आहे असे सार्वजनिक/खाजगी ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी असलेल्या कापड किंवा इतर कोणतेही साहित्य असा आहे. सण, उत्सव, स्वागत समारंभ जयंती इ.साठी जास्तीत जास्त तीन दिवस बॅनर लावता येतील.<br>6 फुट x3 फुट , 8 फुट x3 फुट ,<br>8 फुट x6 फुट | प्रति दिन रू.500/- (तीन दिवसाकरिता) मुदतीनंतर स्वताहून काढून घेणे आवश्यक + इतर शासकीय कर. |
| 4. | इलेक्ट्रॉनिक्स डिस्प्ले | एखाद्या संरचनेवर बसविलेला, इलेक्ट्रॉनिक्सरित्या प्रवर्तित होणारा जाहिरात डिस्प्ले हा निऑन दिवे, एल.ई.डी. किंवा एलसीडी यांसारखे इलेक्ट्रॉनिक्स किंवा विद्युत साधन | रक्कम,रू. 7,000/- (वार्षिक) अनामत र.रू. 10,000/- जाहिरात (होर्डिंग) परतावा + इतर शासकीय कर |
| 5. | निर्देश फलक | खाजगी वा वाणिज्यिक आस्थापनेने आपल्या कार्यालयांचा किंवा वाणिज्यिक आस्थापनेची दिशा सूचित करण्यासाठी उभारलेला फलक असा आहे. (दुकानावरील 1 बोर्ड वगळता) | प्रति चौ.फुट रक्कम रु.50/- (वार्षिक) + इतर शासकीय कर. |
| 6. | ग्लो साईन बॉक्स जाहिरात (BACK LIGHT) | धातुच्या पत्राच्या पुढील बाजूस कोणतेही पारदर्शक,अर्धपारदर्शक पडदा बसवून, तिच्या मागील बाजूकडून विद्युत दिव्यांचा उपयोग करून प्रदर्शित केलेली जाहिरात, असा आहे. | रक्कम रू.10,000/- (वार्षिक) + इतर शासकीय कर |

पान नं.3 वर

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | फिरते जाहिरात डिस्प्ले | वाहनावर किंवा वाहनाच्या पाठीमागे बसविलेल्या एक किंवा दोन दर्शनी बाजूंचा जाहिरात फलक (होर्डिंग) किंवा दर्शक पाटल (पॅनल) असा असून, ते वाहन अशा रीतीने जाहिरात अधिक चांगल्या प्रकारे प्रदर्शित करण्यासाठी मोक्याच्या ठिकाणच्या आसपास चालविता येते किया वे उभे करता येते. | प्रति चौ.फुट रक्कम रू.50/- प्रति दिन + इतर शासकीय कर |
| 8. | वृक्ष संरक्षण जाळयावरील जाहिरात | विटा परिषदेच्या हद्दीतील वृक्षांना जाळी देणगीदाराने बसविल्यास त्याचे नावाची मोफत जाहिरात मा. मुख्याधिकारी यांच्या मान्यतेने व अटीने प्रदर्शित करता येईल व या व्यतिरिक्त ज्यांच्या नावाची जाहिरात वृक्ष जाळीवर करावयाची आहे त्यांना. | रक्कम रू.,7,300/- (वार्षिक) प्रति वृक्ष जाळी + इतर शासकीय कर. |
| 9. | किऑक्स/ T-CANTILE | खांबाच्या एका किंवा दोन्ही बाजूस प्रदर्शित केलेली जाहिरात | रक्कम रू.3,000/- (वार्षिक) प्रति किऑक्स, प्रति बाजू + इतर शासकीय कर. |
| 10 | सायकल वरील जाहिरात | सायकल वरील प्रसिद्ध करायच्या जाहिराती. | प्रति दिन, प्रति सायकल 100/- रू. इतर + इतर शासकीय कर. |
| 11 | आकाश चिन्ह (स्काय-साईन) अप्रकाशित जाहिरात | आकाश चिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो ते आकाश चिन्ह असा आहे. | प्रति चौ. फुट रक्कम रु.100/- (वार्षिक) व अनामत रक्कम 5,000/- + इतर शासकीय कर. जाहिरात (होर्डींग) परतावा + इतर शासकीय कर. |

पान नं.4 वर

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | रोड शो रस्त्यावर / चौकात / मोकळ्या जागेत | | (1) सिनेमा चित्रीकरण करण्याकरिता 3,000/- रू.प्रति दिन + इतर शासकीय कर.<br>(2)व्यवसायिक कामाकरिता2,000/- प्रतिदिन+ इतर शासकीय कर.<br>(3)सामाजिक संदेश करिता मुख्याधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने – मोफत |
| 13 | लेखपट्टक दर्शी (स्क्रोराल डिस्प्ले) | याचा अर्थ जाहिरात प्रदर्शित करणाऱ्या दर्शक पटलावर मुद्रित पात अखंडीतपणे आवर्तन पद्धतीने फिरण्यासाठी काळ बसविलेल्या पेटीच्या आकारातील दर्शक पटल असा आहे मग ती प्रकाश योजना असलेली किंवा नसलेली असेल | रक्कम रू.5,000/- फरणाऱ्या प्रति स्कोरलर डिस्प्ले (वार्षिक) + इतर शासकीय कर. |
| 14 | भिंत/रस्त्यातील लिखाण | विटा नगर परिषदेच्या सामाजिक व शासकीय कामा व्यतिरिक्त इतरांना परवानगी नाही. | शास्ती फी 2,000/- रू. आणि मालमत्ता विद्रुपण कायदा 1995 नुसार कारवाई + इतर शासकीय कर. |
| 15 | तात्पुरत्या कमानी/मंडप उभारणे | समारंभ, कार्यक्रम व इतर करता तात्पुरती कमानी/मंडप ठराविक दिवसा करिता उभारणे. | प्रति दिन रु.500/- |
| 16 | टूर आणि ट्रॅव्हल्ससाठी व्यवसाय नाहरकत प्रमाणपत्र | ना-हरकत प्रमाणपत्र | रक्कम रुपये 1,000/- (वार्षिक) + इतर शासकीय कर |
| 17 | जाहिरात परवाना फि | एकदा परवाना घेतल्यानंतर तो 3 वर्षाकरीता असेल. दर 3 वर्षानंतर परवान्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक असेल | प्रथम वेळी र.रू.3,000/- (3वर्षासाठी) नुतनीकरण फि र.रू.1,000/- |
| 18 | विना परवाना/परवानगी जाहिरात प्रदर्शित केलेस दंड | वर नमुद 1 ते 17 जाहिरात प्रकारापैकी कोणतीही जाहिरात विना परवाना/परवानगी लावलेस दंड | जाहिरात निहाय नमूद दराच्या 3 पट |

पान नं.5 वर

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र नगरपरिषद (जाहिरातीवरील कर) नियम, 1970, मा. उच्च न्यायालयाचे PIL NO. 155/2011 दि. 31/01/2017 तसेच शासन निर्णय क्र. पीएमसी- 3010/प्र.क्र.394 ( भाग -2)/ नवि-22 दि. दि.22/06/2023 नुसार विटा शहर हद्दीत जाहिरातींना परवानगी देणेस व उक्त नमूद केलेले अ.क्र.1 ते 18 मधील जाहिरातीचा प्रकार, तपशील व दर यास मंजुरी, संदर्भ क्र.3 नुसार विषद करण्यात आलेले (आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शक तत्वांना देणे व नगर परिषदेमार्फत जाहिरात/होर्डिंग वर शुल्क आकारणी करण्यासाठी करण्यात आलेला सर्वसाधारण ठराव क्रं.84, दि.21/12/2021 रद्द करून वरील प्रस्तावित दर आकारणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

Scanned with OKEN Scanner